MHAU090010092026

## निशाणी क्र.६ खालील आदेश

अर्ज हा दुरुस्ती साठी दाखल केला आहे. अर्जदार यांनी मुळ अर्जात काही दुरुस्ती करावयाची आहे. सबब, अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

२. युक्तीवाद ऐकुन घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामध्ये न्यायालयाने जाहिर प्रगटण निर्गमित केले आहे. तसेच वृत्तपत्रात देखील प्रकाशीत झाले आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. अर्जदारांना मुळ अर्जात दुरुस्ती करावयाची आहे. सदरची दुरुस्ती ही नाते संबंधाची आहे. तो त्यांना वगळायचा आहे. त्यामुळे मुळ अर्जात बदल होणार नाही. परंतु त्याचा परिणाम काय होणार आहे, याची जाणीव अर्जदार यांना आहे. कारण जाहिर प्रगटण निर्गमित व वृत्तपत्राामध्ये जाहिर करण्यात आले होते. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना अर्जात नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. अर्जदार यांना पुन्हा जाहिर प्रगटण निर्गमित व वृत्तपत्रामध्ये जाहिर निर्गमित करण्याची मुभा देण्यात येते.

RAJU BHASKAR DOLE
Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.08.03 15:00:17 +0530

दिनांक – ०३.०८.२०२६

**(रा.भा. डोळे)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पैठण.